Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 1, April 2023; Pages 01 –04
Original Research Article

# होट्टल येथील मंदिर स्थापत्य - एक अभ्यास

शिंदे अनंत नामदेवराव
इतिहास विभाग, कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, उदगीर जिल्हा लातूर ४१३५१७ महाराष्ट्र, भारत
*E-mail:* anantshinde1980@gmail.com

Received: 12 February, 2023 | Accepted: 10 March, 2023 | Published: 13 March, 2023

मराठवाडयातील नांदेड जिल्ह्यात देगलूर ह्या तालूक्याच्या ठिकाणापासून १० कि.मी. अंतरावर प्राचीन कालीन ‘पोट्टल’ शहर यालाच आज होट्टल असे म्हणतात.

आज हे शहर नसून खेडेगाव आहे. या गावात अनेक जाती धर्माचे लोक राहतात. या ठिकाणी ग्राम देवता म्हणून खंडोबा, मारोती, भवानी, परमेश्वर, पोच्चमा ग्रामदेवता इ. मंदीरे आहेत.

त्याच बरोबर प्राचीन काळातील हेमाडपंती एकूण तीन मंदीरे आहेत. ते शिवाचे शिवालय आहेत. एक गावाच्या पूर्वेस व दोन गावाच्या पश्चिमेस आहे. त्यात प्रामूख्याने पुरातत्वीय खात्याने मंदीराचे दुरुस्ती करावयाचे काम चालू आहे.

**महत्वाचे शब्द:** मंदिर स्थापत्य, होट्टल, नांदेड, देगलूर, पोट्टल,

## सिध्देश्वर मंदिर

उत्तर चालूक्य शैलीचे एक उत्तम मंदिर म्हणजे सिध्देश्वर मंदिर होय. याच मंदिरात सापडलेला शिलालेखावरुन हे मंदिर ‘सिंध्दुगी’ याने बांधले. तो वन्ही कुळातील राजांच्या पदरी होता आणि ते राजे कल्याणीच्या चालुक्याचे सामंत होते. हा शिलालेख ११२० इ.स. म्हणजेच विक्रमादित्य सहावा यांच्या काळातील आहे. या शिलालेखावरुन असे समजते की जवळजवळ १००० खेडयातून देणगी गोळा करुन सोमेश्वराने सिध्देश्वर मंदिराला दिली याची नोंद आहे. ह्या मंदिराची उभरणी एका पीठावर ‘जगती’ वर ते उभे आहे. जगती उंच आहे पीठाची रचना मंदिराला साजेशी आहे. कठडा ब-याच ठिकाणी पडलेल्या अवस्थेत आहे. यावरुन पाषानाचे अस्तित्व होते असे लक्षात येते. एकच गर्भगृह असलेले हे मंदिर आहे. मुख्य मंडप, मंडप, दोन अर्धमंडप, अंतराळ आणि गर्भगृह अशी मंदीराची रचना आहे. संपूर्ण वास्तूची मोजमापे ७२ फूट x 55 फूट अशी आहे. पीठाला पाय-या आहेत. पाय-यांच्या दोन्ही बाजूला देव कोष्टे आहेत.

## मुख्य मंडप

मुख्यमंडप म्हणजे एक खुला मंडप असून त्याची मोजमापे १५ फुट x १० फुट अशी आहेत. मुख्य मंडपाच्या प्रवेशद्वारापाशी दोन्ही बाजूला एक असे दोन स्तंभ आहेत. मुख्य मंडपाच्या छताला या दोन स्तंभानी आधार दिला आहे. मुख्य मंडपात जाण्यासाठी पाय-या आहेत. मंडपाच्या प्रवेशद्वाराच्या बाजूला अर्धभिंती आहेत. या

अर्धभिंतीलाच मंडपाच्या आतील बाजूने कक्षासन आहेत. अर्धभिंतीच्या बाहेरील बाजूने जमिनीला आडवे समांतर शिल्पपट्ट आहेत. त्या पट्टांवर लघु अर्धस्तंभ, अर्धस्तंभ, भक्त गणांच्या लघुशिल्पे, न्याल, वेदिका पट्ट असे विविध शिल्पकाम आहे.

**मंडप**

मंडप चौरसाकृती असून ३५ फूट x ३५ फूट असा त्याचा आकार आहे. मंडपाला तीन प्रवेशद्वारे आहेत. तिन्ही प्रवेशद्वारांना अर्धमंडप आहेत. मंडपाच्या तीन बाजू अर्ध खुल्या आहेत. मंडपाची जमीन गुळगुळीत आहे. मंडपात मध्यभागी रंगशीला आहे. मंडपामधून अंतराळाच्या दालनात प्रवेश करताना दोन्ही बाजूस दोन देवकोष्ट आहेत. ते भिंतीतून किंचीत पुढे आलेले आहेत आणि त्यांना छोटे शिखर आहे. मंडपातील मध्यावरचे छत हे सुंदर कोरीव कामाचे उदाहरण म्हणता येईल. फुलांचे हार असलेली नक्षी आणि गळयातील हाराप्रमाणे नक्षीची पुनरावृत्ती झालेली दिसते. दगडी तिरप्या दगडी तुळया वितानावर आहेत. त्यावर किर्तमुख कोरलेले आहेत. मध्यावर अष्टकोनी पुष्पाची नक्षी आहे. त्या भोवती तशीच लघुरुपातील नक्षी आहे. संपूर्ण छत हे कोरीव कामाचा उत्तम नमुना आहे.

**स्तंभ**

मंदिरात एकूण १८ स्तंभ आहेत. त्यापैकी ८ स्तंभ मंडपाच्या अर्ध्यभिंतीवर आहेत. मंडपाच्या मध्यभागी चौकोनी रंगशिलेच्या चार कोपऱ्यावर आहेत. या स्तंभचे तळखडे चौरस आहेत. वरचा भाग आयताकृती आहे. त्यावर आडवे शिल्प पट्टे/ बंध आहेत. स्तंभाच्या मध्यभागी जो चौरस भाग आहे, त्यावर फुलाची नक्षी आहे. अतिशय कोरीव केलेले स्तंभ आहेत.

**अर्धमंडप**

मंडपाला उत्तर व दक्षिण बाजूला एक एक अर्धमंडप आहेत. याची मोजमापे १० फूट x ५ फूट अशी आहेत. मुख्य मंडपातील वितानाची रचना आहे. त्याचप्रमाणे अर्धमंडपातील वितानाची रचना. आहे. दोन्ही बाजूच्या अर्धमंडपातील आतील बाजूस कक्षासने आहेत.

**अंतराळ**

अंतराळाच्या दालनाचे मोजमाप १० फूट x १५ फूट अशी आहेत. उत्तर आणि दक्षिण बाजूच्या भिंतीवर एकेक अशी दोन देव कोष्टे आहेत. मंडप आणिअंतराळ यात एक वातायनरुप भिंत आणि दोन स्तंभ आहेत. द्वाराची ललाटपट्टी कोरीव कामाने सजलेली आहे. यासाठी व्याल आणि कीर्तिमुख या प्रतीकांचा वापर केलेला आहे. यावर कदब शैलीचा प्रभाव दिसतो. दोन स्तंभ प्रवेशद्वाराच्या दोन बाजूला आहेत. या स्तंभाच्या मध्यभागावर दोन स्त्री शिल्पे आहेत द्वारशाखेच्या दोन्ही बाजूला स्तंभ आणि भिंत यामध्ये दगडी जाळी आहे.

**गर्भगृह**

गर्भगृह हे चौरसाकृती असून त्याची मोजमापे १५ फूट x १५ फूट अशी आहे. मंडपाच्या जमिनीच्या स्तरापेक्ष १२ फूट खाली गर्भगृहाच्या जमिनीचा स्तर आहे. गर्भगृहाच्या भिंती साध्या सपाट आहेत. देवकोष्टे नाहीत. चार कोपऱ्यांवर चार स्तंभ आहेत. जमिन सपाट व गुळगुळीत असून मध्यावर शिवलिंग आहे. गर्भगृहाचे प्रवेशद्वार कोरीव कामाने सजवलेले आहे. त्यावर पुष्प, प्राणी, लतापल्लव आदि प्रतीके कोरलेली आहे. दोन्ही बाजूला अर्धस्तंभ आहेत. अर्धस्तंभाच्या तळाशी शिवद्वारपाल कोरलेले आहेत. ललाट बिंबावर गजलक्ष्मी आहे. चालूक्यांच्या मंदिरावर गजलक्ष्मी शिल्प हमखास असते.

**मंदिराचा बाह्यभाग**

मंदिराचा बाह्य भाग हा उंच पीठावर आहे. पीठाची उंची ८ फूट आहे. सध्या पीठाचा बराचसा भाग मातीत गाडलेला आहे. जमिनीला समांतर असलेले पीठावरचे पट्ट आता दिसत नाहीत. त्यामुळे त्यांच्या विषयी काही सांगता येत नाही. पीठाला पद्म, कणी, कुमुद पट्ट आहेत. भिंतीची मांडणी केलेली आहे त्यामुळे भिंतींना बाहेरुन अनेक कोन तयार झाले आहेत. या भागावर अनेक शिल्पे कोरलेली आहेत. त्यामध्ये देवदेवता, नर्तक, वादक आहेत. दगडी भांडे ही आहेत. भितीच्या अर्धस्तंभासारख्या भागावरही शिल्पे आहेत. बाह्यभागावर तीन प्रमुख देवकोष्टे आहेत. त्या देवकोष्टात चामुंडा, नटराज व अंधकासुरवधाची शिल्पे, अनेक नृतीका नृत्याचे प्रकार, विविध वाद्य घेऊन नृत्य सादर करत आहेत अशी शिल्पे आहेत. मंदिराच्या परिसरात असंख्य शिल्पावशेष विखरुन पडलेले आहेत.

**महादेव मंदिर**

सिध्देश्वर मंदिराच्या बाजूला हे मंदिर दुरुस्तीच्या मार्गावर आहे. मंदिर उंच पीठावर असून पीठावरच प्रदक्षिणापथ आहे.

मुख्य मंडप, नंदीमंडप, अंतराळ, गर्भगृह अशी एकूण मंदीराची वास्तू आहे. मंदिराचे दुरुस्तीचे काम चालू आहे. हे पूर्ण होण्यासाठी बराच काळ लागेल असे वाटते. मंडपाच्या बाह्यांगावर कोरीव काम आहे. त्यामध्ये भौमितिक नक्षी, लाकडावरच्या नक्षीकामाप्रमाणे तिक्याच हळुवारपणे पाषाणावर केलेले नक्षीकाम याचा समावेश आहे. मंडप चौरसाकृती असून मुख्यमंडपात कक्षासन आहेत. कक्षासनांचा पाठीवरही नाजूक कोरीव काम आहे.

मंदिराच्या बाह्यभगावर आज दुरुस्ती चालू आहे. नृतीकेचेही शिल्प आहेत. त्याचबरोबर तीन देव कोष्टे आहेत. त्यात कोणतीही मुर्तीशिल्पे नाहीत.

या मंदिराचे मुख्य वैशिष्टये म्हणजे या मंदिरासाठी वापरलेल्या पाषाणापैकी काही पाषाणावर आघात केल्यास संगीतातील सप्तसूर त्यातून निघतात. या मंदिरातील काही पाषाणतून आजही सप्तसूर ऐकता येतात.

महादेव मंदिराचे छत, स्तंभशैली, द्वाराशाखा बाह्यभिंतीवरची शिल्पसृष्टी, सर्व काही सिध्देश्वर मंदिराप्रमाणेच आहे. त्यावरुन आपणअसे म्हणू शकतो की, ११व्या – १२व्या शतकात चालूक्यराज वंशाच्या आश्रयामुळे हेही मंदिर उभे राहिले. चालूक्य आणि कदंब शैलीचा प्रभाव या मंदिरावर निश्चितपणे आहे.

**सोमेश्वर मंदिर**

याच होट्टल नगरीतील इ.स. ११०१ सालातले हे सोमेश्वर मंदिर आहे. खरे तर त्याआधी बांधले गेलेले इ.स. ११०१ मध्ये या मंदिराला दान दिल्याचा उल्लेख असलेला शिलालेख येथे आहे. चालूक्य राजा विक्रमादित्य याने त्याच्या २६व्या राज्यवर्षी मंदिरासाठी दान दिले होते. या संबंधीचा शिलालेख सोमेश्वर मंदिरात आहे. या लेखातील २६ वे राज्यवर्ष म्हणजे इसवी ११०१ हे वर्ष होय. याचा अर्थ इसवी ११०१ या अगोदर म्हणजे ११व्या शतकातील मंदिर स्थापत्य शैलीच्या शिलालेखीय पुरावाच इथे उपलब्ध आहे.

या लेखवरुन आपल्याला असे लक्षात येते की, हे मंदिर पूर्वी त्रिपुरुषदेव या नावाने ओळखले जात होते. हे मंदिर ब्रम्हा, विष्णु, महेश या तीन देवाचे होते ते त्रिकुट/त्रिदल रचनेचे मंदिर आहे.

मुख्य गर्भगृह हे चौरसाकृती आहे. त्याचे माप ९ फूट x ४ फूट अशी आहेत. पूर्वी या गर्भगृहात शिवलींग असावे असे दिसते. गर्भगृहाचे प्रवेशद्वार ६.५ फूट x २.१ फूट अशा मापाचे आहे. या द्वाराला कोरीव द्वारशाखा आहेत. पत्रस्तंभ, पुष्प या त्या शाखा आहेत. दोन्ही बाजूच्या द्वारशाखांच्या तळाशी शिवद्वारपाल आहेत. ललाटबिंबावर गणेशाची आसनमूर्ती आहे.

दुसरे गर्भगृह हे विष्णुचे आहे. ते उत्तराभिमुख आहे. मोजमाप आणि कोरीव नक्षी या दोन्ही बाबतीत पूर्वाभिमुख असलेला मुख्य गर्भगृहाप्रमाणे साम्य आहे. ललाटबिंबावर कोरलेली गजलक्ष्मी ही देवता वैष्णव पंथाचे सह्यर्थ दाखवते. द्वारशाखेवर वैष्णव द्वारपाल, गदा, शंख, पंद्य या प्रतीकांसह कोरलेले दिसतात. तिसरे गर्भगृही दोन्ही गर्भगृहाप्रमाणे आहे. हे दक्षिणाभिमुख आहे. ललाटबिंबावर लक्ष्मी सुखासनात बसलेली दाखवलेली आहे. मात्र हे गर्भगृह पूर्णपणे भग्न झाले असून द्वारशाखाही मोडकळीस आलेली आहे. आज तेथे घाणीचे साम्राज्य झाले आहे. गावातील रिकामी माणसे पत्यांची डाव मांडताना दिसतात.

**मुख्य मंडप**

मुख्य मंडपाच्या स्वरुपातला हा मंडप म्हणजे एक चौरसाकृती दालन असून त्याची मोजपामे ११ फूट ११ x फूट अशी आहेत. दालनात रंगशीला आहे. तिच्याभोवती चार स्तंभ आहेत. छताची बाजू ही सुंदर अशी कोरीव नक्षी केलेली आहे. गुढमंडप तिन्ही बाजूंनी बंदिस्त आहे. दर्शनी बाजूने तो अर्धा खुला आहे. आठ लघुस्तंभ वरचे छत पेलून धरतात. वामन भितीमध्ये तीन स्तंभ आहेत. तेथे कक्षासन आहेत. स्तंभावर सिध्देश्वराच्या स्तंभावरील प्रमाणे नक्षीकाम केलेले आहे.

**मंदिराचे बाह्यभाग**

संपूर्ण मंदिराच्या बाह्यभिंतींना प्रक्षिप्त/ क्षिप्तभाग आहेत. प्रक्षिप्त भागावर सुंदर अर्धस्तंभ आहेत व सखोल भागात सुर सुंदरी आणि अप्सरांची सुंदर कोरीव शिल्पे आहेत. बाह्यांगावर तीन देवकोष्ट आहेत. गर्भगृहाच्या पाठीचा भाग पूर्णपणे पडलेला असून मंदिर हे जणू बांधकामाच्या उध्वस्त अवशेषाच्या ढिगाऱ्यातच उभे आहे ते जमिनीत खचत चालेला आहे. हा वैभव संपन्न वारसा प्रत्येकाने जोपासला पाहीजे.

**संदर्भ**

1. मराठवाडयातील प्राचीन मंदिर स्थापत्य शिल्पाविष्कार – डॉ. प्रभाकर देव, अपरांत पब्लीकेशन्स, पुणे २०१७
2. असाही मराठवाडा - डॉ. किरण देशमुख, निर्मल प्रकाशन, नांदेड - मार्च २०१२
3. मराठवाडयाचा इतिहास - प्रा. एस. एस. भंडवलकर, प्रा. यु. एस. हनवते - अभिजीत पब्लिकेशन, लातूर - जून १९९९